# Punyanagari

## Highest salary to e-commerce employee

**Date: 27/07/2016 | Edition: Mumbai | Page: 8 | Source: Bureau | Clip size (cm): W: 6 H: 13**

India Media Monitor

**Clip: 1 of 1**


## ई-कॉमर्स कामगारांना सर्वाधिक वेतन

**नवी दिल्ली :** देशात ई-कॉमर्स आणि लाईफ सायन्स या क्षेत्रात नोकरी करणाऱ्या कर्मचाऱ्यांना सर्वाधिक वेतन मिळेल, असा अंदाज विज्डम जॉब्स डॉट कॉम संकेतस्थळाने केलेल्या कॉर्पोरेट उद्योग क्षेत्रातील स्टार परफॉर्मन्सच्या वेतनवाढीबाबत सर्वेक्षणातून निदर्शनास आले आहे. सर्वेक्षण अध्ययनातून मिळालेल्या माहितीनुसार, चालू आर्थिक वर्षात जुलै ते डिसेंबर दरम्यान उत्तम कामगिरी करणाऱ्या स्टार परफॉर्मर कामगारांना १०.७ टक्के वेतनवाढ मिळणार आहे. अशी वेतनवाढ मिळवण्यात लाईफ सायन्स आणि ई-कॉमर्स क्षेत्रातील कर्मचारी सर्वात पुढे असतील. विज्डम डॉट कॉमने दिल्ली, मुंबई, हैदराबाद, आणि चेन्नई या शहरांतील कर्मचाऱ्यांचे सर्वेक्षण करून हा निष्कर्ष काढला आहे. या निष्कर्षात विविध उद्योग क्षेत्रांतील कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीचा निष्कर्ष काढण्यात आला आहे. यानुसार, सर्वाधिक १५.६ टक्के वेतनवाढ ई-कॉमर्स क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना मिळणार आहे. तसेच लाईफ सायन्स क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना ११.८ टक्के तर प्रसारमाध्यमे आणि आयटी तंत्रज्ञान क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना १०.९ टक्के वेतनवाढ करून देण्यात येणार आहे. तसेच कन्झ्युमर क्षेत्रातील कामगारांना देखील १०.५ टक्के वेतनवाढ मिळणार आहे.